# महात्मा गांधींचा राष्ट्रधर्म





गिरीश श्री. बापट

# महात्मा गांधींचा राष्ट्रधर्म

- भाग १ : सत्याचा शोध

- भाग २ : राष्ट्रधर्माचे आचरण
  (विवेकानंद, महात्मा गांधी
  आणि ज्ञान प्रबोधिनीतील प्रयोग)

**गिरीश श्री. बापट**

| | |
|---|---|
| ♦ प्रकाशक | वि. शं./सुभाष देशपांडे<br>कार्यवाह, ज्ञान प्रबोधिनी<br>(सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन) |
| ♦ दूरभाष | (०२०)२४२०७००० |
| ♦ ई-मेल | contact@jnanaprabodhini.org |
| ♦ मुद्रक | मोनार्क प्रिंट आर्टस्<br>७१६, सदाशिव पेठ<br>कुमठेकर रस्ता, पुणे ३० |
| ♦ मूल्य | रु. ६०/- |
| ♦ प्रकाशन दिनांक | द्वितीय आवृत्ती(५०० प्रती)<br>सौर १ आषाढ शके १९४१<br>दि. २२ जून २०१९<br><br>प्रथम आवृत्ती (५०० प्रती)<br>सौर २८ श्रावण, शके १९३३.<br>दि. १९ ऑगस्ट, २०११. |
| ♦ मुखपृष्ठ | श्रीमती अनघा इनामदार |

# लेखकाचे निवेदन

गुजराथमध्ये नवनिर्माण आंदोलनाचा पहिला बहर ओसरल्यानंतर जून १९७४ मध्ये अभ्यासदौऱ्यासाठी अहमदाबादला गेलो होतो. त्यावेळी सर्वोदयी कार्यकर्ते रविशंकरमहाराज यांची भेट घेतली होती. गांधी-विचार जगणाऱ्यांशी तो माझा पहिला संपर्क. मी तेव्हा महाविद्यालयाची शास्त्रशाखेच्या प्रथम वर्षाची परीक्षा दिली होती. त्या वेळी रविशंकरमहाराजांचे वय नव्वदीच्या आसपास असावे. फारसे बोलणे होऊ शकले नाही. परंतु त्यांचा चेहरा आणि त्यांनी ज्या भावपूर्ण रितीने बापूजींच्या नावाचा उल्लेख केला त्यामुळे गांधीजींचे जीवन व विचार जाणून घेण्याची उत्सुकता मनात निर्माण झाली.

ज्ञान प्रबोधिनीमध्ये १९८४ साली गांधी विचार अभ्यास शिबिर झाले. त्या शिबिराचे नियोजन करताना कै. भाऊ धर्माधिकारी यांचे मार्गदर्शन घेतले होते. गांधी विचार जगणाऱ्या या ज्येष्ठ कार्यकर्त्याचे बोलणे-चालणे पाहून गांधी विचार समजून घेण्याची इच्छा अधिक तीव्र झाली. नागा प्रदेशात १९८७ मध्ये दोन महिने होतो, तेव्हा 'नागालॅण्ड गांधी' श्री. नटवरभाई ठक्कर यांचे नाव व काम प्रथम ऐकले. पुढे काही वर्षांनी त्यांची प्रत्यक्ष भेटही झाली.

राष्ट्रघडणीच्या कामात झोकून देऊ इच्छिणाऱ्यांनी गांधी विचार समजून घेणे अपरिहार्य आहे याची खात्री १९९३ च्या सप्टेंबरमध्ये त्रिवेंद्रमजवळील मित्रनिकेतन मध्ये एका चिंतन-बैठकीत झाली. या बैठकीसाठी आलेल्या विजयवाड्याच्या Atheist Centre च्या श्री. विजयम् यांच्याबरोबर एकाच खोलीत आठवडाभर राहिलो होतो. त्यांच्या निरीश्वरवादी आई-वडिलांच्या निरीश्वरवादाला धक्का न लावता गांधीजींनी सगळ्या कुटुंबाला कार्य-प्रवृत्त कसे केले याची कथा तेव्हा त्यांच्याकडून ऐकायला मिळाली. त्याच चिंतन-बैठकीत मदुराई जवळच्या गांधी-आश्रमाचे प्रमुख श्री. मुनिआंडी यांचीही भेट झाली. गांधीजींचा 'नई तालीम'चा प्रयोग मुख्यतः प्राथमिक शिक्षणाचा होता. श्री. मुनिआंडी यांनी तो प्रयोग चरखा, शरीरश्रम, खादी

यांच्याच आधाराने माध्यमिक व उच्च शिक्षणाच्या स्तरापर्यंत वाढवला होता. अनुभवातून निर्माण झालेली त्यांची या प्रयोगावरची निष्ठा त्यांच्या बोलण्यातून सतत व्यक्त होत होती.

मुख्यतः या पाच व्यक्तींच्या भेटींमुळे गांधी चरित्र व विचाराचा माझा अभ्यास चालू झाला व चालू राहिला. स्वाध्यायाला पक्के करण्यासाठी प्रवचनाची जोड द्यावी म्हणून २००८-०९ मध्ये आठ भागांमध्ये महात्मा गांधींचे चरित्रकथन आणि नंतर दोन व्याख्यानांमध्ये त्या चरित्राचे परिशीलन असा प्रकल्प पूर्ण केला. परिशीलनाच्या दोन व्याख्यानांच्या प्रकाशनाचा योग त्यानंतर पावणेदोन वर्षांनी येत आहे. व्याख्यानमाला संपल्यानंतर देखील गांधी चरित्राचा आणि त्यातील रहस्याचा शोध मनात चालू होताच. महात्मा गांधींचे कार्य पूर्वार्धात पूर्ण झाले. ज्ञान प्रबोधिनीचे काम त्या शतकाच्या उत्तरार्धात सुरू झाले.

विवेकानंदांच्या विचाराच्या प्रकाशात ज्ञान प्रबोधिनीचे काम सुरू झाले. त्या कामाला गांधी विचाराच्या अभ्यासाने अधिक बळकटी येते आहे, असा अनुभव येतो आहे. व्याख्यानमाला संपल्यानंतरच्या पावणेदोन वर्षात राष्ट्र (Nation) आणि राष्ट्र-राज्य (Nation-State) या संकल्पनांच्या प्रकाशात विवेकानंद आणि गांधी विचारावर चिंतन चालू होते. दोघांनीही राष्ट्र-राज्यापेक्षा राष्ट्राच्या विचाराला प्राधान्य दिले आहे, असे जाणवते. विवेकानंद 'आधी विधिमंडळ निवडून देणारे लोक शहाणे करा मग सुधारणांचे विधी (कायदे व त्यांची अंमलबजावणी) आपोआप होतील', या पलिकडे राष्ट्र-राज्याबद्दल फारसे बोलतानाच दिसत नाहीत. महात्मा गांधी आपल्या सत्याच्या शोधाचा एक भाग म्हणून स्वातंत्र्य आंदोलनात पडले. त्या निमित्ताने त्यांना राजकारणही करावे लागले. राजकारणातील आधीच्या प्रदीर्घ सहभागामुळे राजकीय प्रश्नांबद्दल ते शेवटपर्यंत आपले मतही व्यक्त करत गेले. परंतु १९३४ पासून गांधीजी देखील क्रमशः विवेकानंदांप्रमाणेच भूमिका घेताना दिसतात.

आपल्या मृत्यूपूर्वी तीन दिवस आधी २७ जानेवारी १९४८ ला गांधीजींनी काँग्रेसबद्दलची आपली भूमिका पुढील प्रमाणे मांडली आहे - *'The Congress has won political freedom, but it has yet to win economic freedom, social and moral freedom. These freedoms are harder than the political, if only because they are constructive, less exciting and not spectacular. All-embracing constructive work evokes the energy at all the units of the millions.'*

यापुढे गांधीजी असेही म्हणतात की, सुरुवातीला शहरांतील व नंतर क्रमशः अधिकाधिक संख्येने खेड्यांतील काँग्रेस कार्यकर्त्यांनी देशातील सर्व स्त्री-पुरुषांची सेवा करावी आणि त्यांना राजकीय स्वातंत्र्याशिवायची राहिलेली स्वांतत्र्ये मिळवून द्यावीत. विवेकानंदांच्या एकाच वाक्याचा हा गांधीजींनी आपल्या पद्धतीने केलेला विस्तार आहे, असे मला वाटते.

एकविसाव्या शतकात कामाच्या तपशिलाचे बदल होत राहतील. राष्ट्र-राज्य बळकट असणे हे राष्ट्राच्या आरोग्याचे एक लक्षण आहे. विवेकानंद आणि गांधींना वाट पुसत स्वयंप्रज्ञेने, स्वयंप्रतिभेने आणि स्वयंप्रेरणेने ज्ञान प्रबोधिनीने राष्ट्राच्या आरोग्यसंवर्धनाचे काम करत राहिले पाहिजे. राष्ट्र-राज्य बळकट झालेले दिसणे हा त्या आरोग्य संवर्धनाचा अनुषंगिक परिणाम असेल. हिंदुस्थानने बरोबरीच्या नात्याने जगातल्या राष्ट्रांकडून शिकणे व मैत्रीच्या नात्याने जगातल्या देशांना शिकवणे हाच राष्ट्राच्या आरोग्यसंवर्धनाचा म्हणजेच राष्ट्रधर्माच्या आचरणाचा हेतू असला पाहिजे. त्यादृष्टीने चाललेल्या प्रयोगाचे वर्णनच या पुस्तिकेत केले आहे.

ही व्याख्याने ध्वनिमुद्रित केली होती. ध्वनिमुद्रणावरून लिहून काढण्याचे काम कु. निऋता किल्लेदार व वा. स्वर्णलता भिशीकर यांनी सुरू केले. श्रीमती भारतीताई वाडेकर यांनी ते चिकाटीने पूर्णतेला नेले. या हस्तलिखिताचे संपादन प्रथम वा. स्वर्णलता भिशीकर यांनी केले व त्यानुसार

संगणकीय अक्षरजुळणी श्रीमती सरस्वतीताई श्रीगिरी यांनी केली. त्यानंतरच्या संपादनात ज्ञान प्रबोधिनीचे कार्यवाह श्री. सुभाषराव देशपांडे यांनी साहाय्य केले. ज्ञान प्रबोधिनीच्या संचालक कार्यालयातील सदस्यांनी व 'छात्र-प्रबोधन' मासिकाच्या कार्यालयातील सदस्यांनी या पुस्तिकांना अंतिम रूप दिले. मुखपृष्ठ श्री. गिरीश सहस्रबुद्धे यांनी करून दिले. मुद्रण प्रबोध उद्योगने केले. सर्वांना मनःपूर्वक धन्यवाद.

माझ्या या स्वाध्याय-प्रवचनाचा वाचकांनाही काही उपयोग व्हावा हीच अपेक्षा.

- गिरीश श्री. बापट

ज्ञान प्रबोधिनीचे संस्थापक
कै. आप्पासाहेब पेंडसे स्मृतिदिन
सौर २८ श्रावण, शके १९३३
दि. १९ ऑगस्ट, २०११

## द्वितीय आवृत्तीबाबत निवेदन

आधी स्वतंत्रपणे प्रकाशित केलेल्या दोन पुस्तिका या आवृत्तीत एकत्र प्रकाशित करत आहोत. या आवृत्तीचे मुखपृष्ठ अनघाताई इनामदार यांनी केले आहे.